जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/०५/२०२४
## दि.२५/०५/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकाळभोर पो स्टे २८५/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम, वय २३ वर्षे रा. मु.पो.देवुळगांव राजे,ता.दौंड जि.पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०२४ रोजी स.०८/०० वा चे सुमा.पुणे सोलापुर रोडवर एस के बिर्याणी दुकानाच्या विरूध्द बाजुस माळीमळा लोणीकाळभोर ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद ठिकाणी त्यांचे दुचाकी गाडीवरुन जात असताना,नमुद इसमांनी सदर ठिकाणी येवुन फिर्यादी यांना धक्का-बुक्की करून जबरदस्तीने पॅन्टच्या खिशातुन रोख १२,५००/-रू. किं.चे तसेच ७००/- रु.किंमतीचे एक स्मार्ट घडयाळ जबरदस्तीने चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल घोडके मो नं ८८८८८२४२०० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४२९/२०२४,भादविक ४१९,४२०,आयटी ॲक्ट ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३३ वर्षे रा. आंबेगाव पठार पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक व टेलीग्राम लिंक धारक, विविध बँकेचे खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि १४/०५/२०२४ ते २०/०५/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना पार्ट टाईम नोकरी देण्याचे बहाण्याने यु-टयुब वरील व्हिडीओ लाईक केल्यास त्यांचे कंपनीकडुन त्या बदल्यात पैसे मिळणार आहे असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करुन टेलिग्राम लिंक व टेलिग्राम ग्रुपला जॉईन करुन फिर्यादी यांना वेगवेगळे टास्क देवुन त्या बदल्यात फायदा होत असल्याचे भासवुन फिर्यादी त्यांची एकुण ९,३५,३००/-रु. आर्थिक फसवणुक केली . |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.झिने ८८८८८१३३०१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ३०८/२०२४,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक, वय ६१ वर्षे रा.न-हे पुणे |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०५/२०२४ रोजी स.०७/४५ वा.तक्षशीला सोसायटी समोर,सर्व्हीस रोडवर,भूमकर ब्रिजजवळ,न-हे, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी व त्यांची पत्नी असे दुचाकी गाडीवरुन जात असताना,त्यांचे गाडीस पाठीमागुन जबर ठोस मारून,फिर्यादी यांना गंभीर जखमी करून,त्यांची पत्नी संगीता संजीव टेंभे, वय ५५ वर्षे,रा.शिवशक्ती हाईटस,व्हीजन इंग्लीश मिडीयम स्कुलचे शेजारी, न-हे, पुणे यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एस.चव्हाण मो नं ९७६३९७६७१३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १७९/२०२४,भादविक ४१९,४२०,१७०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३३ वर्षे रा. धानोरी रोड विश्रांतवाडी पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक व टेलीग्राम लिंक धारक, विविध बँकेचे खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २१/०२/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद इसमांनी संगणमत करुन मुंबई क्राईम ब्रँच ऑफीसर बोलत आहे असे खोटे सांगुन खोटी कागदपत्रे पाठवुन व खोटे ओळखपत्र पाठवुन फिर्यादी याच्या नावाने मुबंई येथुन थायलंडला फेडेक्स पार्सल पाठविले असल्याचे सांगुन फिर्यादी यांना अटक करण्याची भीती दाखवुन तसेच सर्व केस क्लिअर करण्यासाठी एनओसी सर्टिफिकेट देतो असे खोटे सांगुन मनी लॉड्रींग बाबत चौकशी करण्याचे बहाण्याचे फिर्यादी यांची एकुण ३,५५,६९३/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.खांदारे मो.नं ९५९४३८६२६२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे २१८/२०२४,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | सुनिल दिघे, वय ४२ वर्षे, रा.शिवणे पुणे |
| **आरोपीत** | एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मागील ०३ ते ०४ महिन्यांपासुन ते दि ०९/०५/२०२४ रोजी दुपारी १३/३० वा. ते ०८/०० वा. चे दरम्यान एक हॉस्पीटल वारजे पुणे व राहते घर विघ्नहर्ता रेसीडेन्सी, दांगट ईस्टेट, आग्रवाल गोडावुन, बोरकंपनीच्या पुढे, शिवणे, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पत्नी वैशाली सचिन गायकवाड, वय ३५ वर्षे रा.बोरकंपनीच्या पुढे,विघ्नहर्ता रेसीडेन्सी,शिवणे पुणे हिस सदर ठिकाणी हॉस्पिटलमध्ये नर्सचे काम करीत असताना,नमुद महिला हिने फिर्यादी यांचे पत्नीस सतत टोचुन बोलुन,तिला शारिरीक व मानसिक त्रास देवुन,तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. एन.आर.जगताप, मो.नं ८००७०६६३०० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३५५/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५० वर्षे रा.वानवडी पुणे |
| **आरोपीत** | लिंक धारक, विविध बँकेचे खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०४/२०२४ ते दि. ०४/०५/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे फेसबुक वरील स्टॉक बाबत जाहिरात पाहुन त्या लिंकवर क्लीक केल्यानंतर त्यांना ग्रुप जॉईन करण्यास भाग पाडुन ट्रेडींगबाबत माहिती देवुन त्यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांची एकुण २१,२५,०००/- रु.आर्थिक फसवणुक केली . |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. राजेंद्र करणकोट मो.नं ८८७९७०६०८८ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५१९/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४९ वर्षे खडकी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०२४ रोजी १३/१५ वा.वाघोली बसस्थानक वाघोली ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पर्स मधील सोन्याचे दागिने १,४७,५२१/- रु.किं.चे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, शिवले मो.नं ८८८८२०१००० |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८५१/२०२४,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | बाळासाहेब यादव, वय ५२ वर्षे, रा. मु.पो. थेउर,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोटार सायकलस्वार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २१/०५/२०२४ रोजी सकाळी १०/००वा. दक्षिण वाहिनी,मांजरी रोड, मांजरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा प्रतिक बाळासाहेब यादव, वय २१ वर्षे रा.मु.पो.थेउर,ता.हवेली,जि.पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. प्रविण अब्दागिरे, २६९९६५७७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**